**सूचना**

लक्षवेध - उप अभियंता (स्थापत्य), प्रशासकीय अधिकारी / मिळकत व्यवस्थापक, सहाय्यक , वरिष्ठ लिपीक या चार संवर्गातील निवड यादीतील यशस्वी उमेदवार.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेल्या सरळसेवा भरती-२०२१ अंतर्गत विविध संवर्गाची अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीतील यशस्वी उमेदवारांना मा. मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्र देण्याचा कार्यक्रम गुरुवार दिनांक ३ नोव्हेंबर,२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरिमन पाँईट, मंत्रालयाजवळ, मुंबई -४०० ०२१ येथील आयोजित करण्यात आला आहे आणि त्या कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे असे म्हाडातर्फे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ च्या ई-मेल व्दारे आपणांस कळविले आहे. तथापि, आपणांस ( उप अभियंता (स्थापत्य), प्रशासकीय अधिकारी / मिळकत व्यवस्थापक, सहाय्यक , वरिष्ठ लिपीक या चार संवर्गातील निवड यादीतील यशस्वी उमेदवार ) कळविण्यात येत आहे की, या चार संवर्गातील यशस्वी उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. याबाबतची सुधारित सूचना दिनांक, वेळ व स्थान वेगळयाने कळविण्यात येईल.

उपरोक्त नमूद चार संवर्गातील निवड यादीतील यशस्वी उमेदवारांना पुन:श्च कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक ३ नोव्हेंबर,२०२२ च्या कार्यक्रमास उपस्थित राहू नये.

उपरोक्त चार संवर्ग वगळता इतर संवर्गातील ज्या उमेदवारांना दिनांक ३ नोव्हेंबर,२०२२ च्या कार्यक्रमास उपस्थित रहाण्याचे कळविले आहे, त्यांनी उपस्थित रहावयाचे आहे, त्यांच्या दिनांकामध्ये काही बदल नाही.

**सचिव / प्राधिकरण**